**About Programme**

आजच्या धावत्या आणि स्पर्धात्मक युगात केवळ एका विषयात प्राविण्य मिळवून चालत नाही तर वेगवेगळ्या विषयांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या गोष्टीचे भान ठेऊन पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयाच्या मराठी विभागाने मुलांचा सर्वांगीण विकास होईल याप्रकाराने अभ्यासकमाचे नियोजन केलेले आहे.

अभ्यासकमामध्ये एकूण 30 विषयाचा समावेश असून त्यापैकी 8 अनिवार्य व बाकीचे ऐश्चिक विषय आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात कलात्मक व गुणात्मक वाढ घडविताना त्यांच्यात साहित्य, वाचन, लेखन व संशोधनविषयक कौशल्यांचा विकास करणे हा या अभ्यासक्रमाचा हेतू आहे. त्यासाठी अभ्यासक्रमामध्ये विविध साहित्यप्रकारांचा अभ्यास, काव्यशास्त्र, रसविचार आणि समीक्षाविचार यासारखे वैविध्यपूर्ण विषय समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

समृध्द गोमंतकीय साहित्यविश्वाचा आजच्या विद्यार्थ्यांना सखोल परिचय करुन देताना त्यामाध्यमातून भावी गोमंतकीय साहित्यकार घडविण्याचा उदात्त हेतू काही विशिष्ट विषयांच्या योजनेमागे असल्याचा दिसतो. उदा. मराठी प्रादेशिक कादंबरी स्वरुप आणि उपयोजन, गोमंतक आणि कोकण प्रदेशातील लोककला, गोमंतकीय मराठी समीक्षा आणि संशोधन (कविता, कथा, कादंबरी, बालसाहित्य) यासारखे विषय शिकविण्याच्या हेतूने विद्यार्थ्यांच्या गोमंतकीय साहित्यकारांशी भेटी घडवून आणल्या जातात व त्या माध्यमातून विद्यार्थी व गोमंतकीय साहित्य यांचा अनुबंध जोडण्याचे प्रशंसनीय कार्य या अभ्यासक्रमाद्वारे केले जाते.

विद्यार्थ्यांना केवळ विषयप्रदान ज्ञान पुरविणे एवढीच आपली जबाबदारी नसून विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनविणे हे आपले कर्तव्य आहे असे हा विभाग मानतो. त्यामुळे आजच्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांना या गोष्टी प्रात्यक्षिक पातळीवर शिकविण्याचे धोरण या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने

अंगिकारण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात उपयुक्त ठरतील व वेगवेगळ्या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देतील याप्रकारचे वेगवेगळे विषय हेतूपूर्वक या अभ्यासक्रमात सामावण्यात आलेले आहेत.

जास्तीतजास्त भाषा अवगत असणे ही आजच्या स्पर्धात्मक युगाची गरज बनलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला केंद्रवर्ती ठेवून कार्यक्रम संयोजन व संचालन कौशल्य, भाषिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्व विकास यासारख्या विषयांचा अंर्तभाव करण्यात आलेला आहे.

एकूणच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला कारणीभूत ठरतील, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतील आणि त्यांना सर्व दृष्टीने सक्षम बनवतील अशा रीतीने अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यात आलेले आहे. बदलत्या समाजाची गरज ओळखून वेळोवेळी अभ्यासक्रमामध्ये बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने हा विभाग नेहमीच प्रयत्नशील असल्याचे दिसते. अन्यत्र उपलब्ध नसतील असे अत्यावश्यक विषय  विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी देऊन त्यांना नेहमीच इतरांपेक्षा दोन पाऊले पुढे ठेवणारा हा अभ्यासक्रम त्यामुळेच वैशिष्ट्यपूर्ण नि महत्वाचा ठरतो.